म. ग्रं. सं. ठाणे
विषय काव्य
सं. क्र. २५४४

# आईची कविता

-श्रीरंग विष्णु जोशी-



REFBK-0025060
REFBK-0025060

संदर्भ काव्य
२५४४
२५०६०
३९१७K

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

सूचना :—खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक/मासिक परत करावे, तसे न केल्यास घटना नियम क्र. ५ [८] नुसार प्रतिदिनी ५ पैसे जादा वर्गणी भरावी लागेल.

2 4 AUG 1986

( क्र. मा. पहा )
५०००–३–८४

# आईची कविता

REFBK-0025060
REFBK-0025060

श्रीरंग विष्णु जोशी

किमत : वीस रुपये

कॉपीराईट :

सौ. कमल श्रीरंग जोशी,
१०८९, रेवणी पथ, पेठभाग,
सांगली : ४१६ ४१६

प्रकाशक :

माया प्रकाशन १३२६, खणभाग,
सांगली : ४१६४१६

वितरणसहाय्य :

अजब पुस्तकालय, भाऊसिंगजी रोड.
कोल्हापूर

चित्र-लिपी :

प्रकाश कामतीकर - श्रीकांत चौगुले

मुद्रक :

विजय प्रिंटिंग प्रेस, भावे नाट्यमंदिर
परिसर, सांगली.

मांडणी :

सखा कुलकर्णी

प्रकाशन दिनांक :

२४ नोव्हेंबर, १९८५

आई आधीची एक आई
आई होण्या आधीच निघून गेली
न परतीच्या वाटेवर कुंकू उधळीत
तिच्या अनोळखी आठवणीस



कापराच्या हलत्या ज्योतीमधून
वितळणारी पारदर्शक कापूरवडी दिसावी
तशी
तुझ्याही पलिकडची तू माझ्यासाठी,
सारा कापूर जळून गेल्यावर
मागे उरते केवळ जळून गेल्याची खूण
मनाला चटका लावणाऱ्या तुझ्या काळीजकोवळ्या
कहाणी सारखी

The day of work is done.
Hide my face in your arms, Mother,
Let me dream.
RABINDRANATH TAGORE

तिनें कडेवर घेतलेले मूल कधी रडलें नाहीं,
तिनें लावलेलें झाड कधी मेलें नाहीं.
तिच्या शब्दांत शुभंकरोति होती,
आणि तिच्या आवाजात ओवी होती.

**जी. ए. कुलकर्णी**

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क.
ग्रंथ शाखा (स्थळ प्रत)

कविता क्रमांक ४८ ' अक्षर दिवाळी १९८४' या पुस्तकातून घेतली आहे.

ऋणनिर्देश :

शंकर सारडा, प्रा. डॉ. प्रभाकर धोंडो गुमास्ते, य. द. लिमये, स्त्री, लोकसत्ता, मराठवाडा, साधना, पुढारी, सकाळ (कोल्हापूर) तरुण भारत (बेळगांव), भुईकोट (सोलापूर) सिंहासन, आकंठ

तुझे जगण्यावरचे गाणे
म्हणजे माझ्यासाठी जगणे
आणि तुझा जगण्याचा उत्सव
म्हणजे माझ्यासाठी गाणे

या ओळीमधून तुला उणे केले
तर गाणे उरणार नाही
या आयुष्यामधून तुला उणे केले
तर जगणे उरणार नाही

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे

इथे
तडकून पुन्हा सांधलेल्या जमिनीची ही करुणमयी भेग
आणि त्या मधून रेंगाळणारे निसटते पांढरेशुभ्र फूल
भूमिगत सीतेच्या वनवासी पदरासारखे,
पलिकडे
नदीवर वाकलेले शोकमग्न आभाळ
आणि विलग झालेल्या लाटेत
बुडून मिसळलेल्या राजाची मेघःशाम छाया,
दूरावर
अयोध्येच्या सौधावरून झेपावत जावेत तसे
हे राजहंसढग,
समोरासमोर
लवकुशा प्रमाणे उभे असलेले पोरके बालवृक्ष
आणि
सोसाट्याच्या वाऱ्यावर परागंदा झालेली ही वाळलेली पाने
एकेकाच्या संदर्भशून्य प्राक्तनासारखी !

आई,
तो रामप्रहर आज हा असा उमलत असताना
सांजसावल्यांच्या रंगखुणा का उमटत आहेत
डोळ्यांतल्या मेघावर ?

# ३

तसे सोपे असते हातात निखारे घेऊन धावणे
किंवा नसानसांत खिळेठोक करून घेणे,
कारण नंतर किमान देशभक्त म्हणून मिरविता तरी येते
किंवा ख्रिस्त म्हणून पूजा बांधली जाते,
पण कोणत्या अज्ञात देशातले सूर्य तुला चैतन्य देतात, हे आई
आणि काळजात कॅन्सरची जळती वेदना घेऊत तू कशी ग
गातेस अंगाई ?

तसे प्रत्येकाचेच श्वास ठरून गेलेले असतात
पण तुझ्या संपत जाणाऱ्या प्रत्येक श्वासागणिक फुले कशी
फुलतात ?

अंगणात सडा घातल्यावर तू, अजून पहाट होते
रांगोळीतली तुझी गाय अजून दूध देते,
तुझ्या सकाळच्या खोकल्याने माझे काळीज फाटते
पण ढांस थांबल्यावर तुला हासू कसे फुटते ?
तुझ्या पूजेआधी देव ताम्हणांत येऊन बसतात
गंगेत बुडती कळशी . . . तुझे डोळे का ग भिजतात ?
अजून तुझ्या नथीपुढे चांदण्या फिक्या पडतात
तुझ्या ओव्यांनी मोत्यावरच्या पाण्यात लाटा उठतात

जुनाच शालू नेसल्यावर तू, नव्यासारखा दिसतो
अजून तुझ्या पदरावरचा जर चमकून उठतो,
काळीजकोवळ्या चैतन्याचे घडे कुठून आणतेस ?
मरता मरता जगण्याचे तू दान देऊन जातेस !

आता कुणाच्याही इच्छेवर अवलंबून नाही तुझे मरणे :
तू तर राहिलीस भरून–
ताऱ्यांमधून वाऱ्यामधून पाखरांच्या चाऱ्यामधून
वेदांतल्या ऋचामधून, दगडाआडच्या ठेचामधून,
मुले मॉंटेसरीला जात राहतील बोट धरून
तोंवर तू उमलत राहशील बोटांआडच्या लाटांमधून,
मुली सासरी जायला निघतील
तोंवर तू निरोप देशील पालवणाऱ्या पदराआडून

नऊवारी साडी नेसून तुझी आठवण येईल
अंगणातल्या वृन्दावनात झाड होऊन राहील,
तिनिसांजेच्या वेळेला तुझी चाहूल येईल
अज्ञाताची स्तोत्रे गात प्रकाश होऊन राहील,

सैपाघराच्या साण्यामधून आकाश खाली येईल
गवरगणपतीच्या कोनाड्यांत चांदणे सांडून जाईल,
गणपती आल्यावर तू गवर होऊन येशील
मखरात बसून देखील घरभर फिरशील,
दसरा झाल्यावर तू दिवाळी होऊन येशील
भाऊबिजेला तू बहीण होऊन हसशील,
तू सणांतून असशील, तू गाण्यातून असशील,
नजरेआडच्या तू पाण्यातून असशील,
कुठल्याही मुंजीत तू भिक्षावळी घालशील
संध्येतली चोवीस नावे जाता जाता सांगशील,
कुठल्याही लग्नात तू मोतीचूर वाढशील
संभ्रमित वधूला उखाणाही सांगशील,
काकणांशी खेळत खेळत तूही नाव घेशील
वरमायेच्या ओठाआड मनापासून हसशील,

आता कुणाच्याही इच्छेवर अवलंबून नाही तुझे मरणे
तू तर राहिलीस भरून—
ताऱ्यांमधून, वाऱ्यामधून, पाखरांच्या चाऱ्यामधून
वेदातल्या ऋचामधून, दगडाआडच्या ठेचामधून

जगणे म्हणजे तुझ्यासाठी एक उत्सव असतो
उत्सवातून आई, तुला शोधत शोधत फिरतो !

# ४

जगाच्या शब्दकोशात शोधून सापडणार नाही असा एक शब्द
उमलून आलाय मनात,
एक कधीच न बोललेला शब्द
ओथंबून आलाय मनात,
पहिल्या पान्हयात निजलेल्या ओंकाराचा आदिशब्द
पालवतोय मनात,
पाळण्याच्या झोक्यात पेंगुळलेल्या दिशांचा जावळशब्द
भुरभुरतोय मनात,
आईच्या बालपणी काढलेल्या फोटोतला हसणारा प्रकाश
रुणझुणतोय मनात,
भूकंपाच्या हादऱ्यानेही न उमलणाऱ्या कळीसारखा
पण अक्षरांच्या श्वासानेही कोमेजून जाईल असा एक शब्द
दाटून आलाय मनात
पानाआड दडलेल्या अर्धवट केळफुलासमान !

# ५

ओढ्याकडली मावशी
देवदर्शनाच्या निमिताने येते
आणि तुझ्या बोलण्याच्या नादात
देवदर्शनच विसरून . . . जाते !
हे तर तुझ्या आभाळाचं चांदणी एवढं दर्शन,
अग,
चार तपं वावरतोय तुझ्या बरोबर सावली सारखा
कधी देहाने, तर सदैव मनाने
पण काही गोष्टी अजूनही सांगायच्या राहून गेल्या
म्हणून तर आता
ही सारी रामकथा,
केवळ माझ्यातल्या तुडुंब तुझेपणासाठी
आणि
तुझ्यातल्या रेंगाळणाऱ्या माझेपणापोटी

ग्रंथालय ठाणे
दा. क.
ग्रंथ शाखा (स्थळ प्रत)

# ६

सडारांगोळी आधी
तांब्याभर पाण्याने न्हाऊन निघणारी आमच्या घराची पायरी
आता अगदी गुळगुळीत झाली आहे
पंढरपुरच्या विठोबाच्या पावलांसारखी
तुझ्या चार तपांच्या पहाटस्पर्शाने,
आणि
दरवाजाचा लाकडी उंबरठा लखलखतोय
मळवट भरल्या रुक्मिणीच्या कपाळासारखा
तुझ्या हातचे सकाळचे हळदकुंकू मिरवीत
आता
चंद्रभागेच्या आठवणीनेही जमू लागते धुके पापणीच्या काठावर

कैक पायऱ्या चढलो उतरलो
तुझ्याच यात्रेकरूच्या पावलांनी,
तुझेच हात जोडले प्रार्थनेसाठी
आणि तुझ्याच ओठांनी पुटपुटलो अनेक स्तोत्रे
कन्याकुमारीच्या वाळवंटात उमटली
माझीही चिमुकली पाऊले तुझ्याबरोबर,
समुद्रावरचा सूर्यास्त पाहिला मी देखील
तुझ्या पापणीतून डोकावून,
आणि तुझ्याच डोळयांत तरळणारा माझाही आनंदमेघ
थरथरत्या दवाहून चिमुकला,
नाळ कापण्याआधी तीन महिने
घडविलीस तीर्थयात्रा . . .
अजूनही डुचमळतात आठवणी रामेश्वरी लोटचात

८

तू इतकी आई आहेस की
ओळख नसताना देखील
मी
तुला मारली असती हाक ' आई ' म्हणून
भर देवी चौकात,
आणि
तूही ठेवले असतेस हातावर
खडीसाखरेचे दोन खडे थोडे हसत
प्रसाद म्हणून

काकू सुद्धा म्हणायच्या
तुला
ते पिवळे लुगडे सुरेख दिसते !
सुरेख म्हणजे कसे ?
केतकीच्या कणसात
पानावर पान चढावे तसे

टोपपदराचा घोळ पायावरी लोळे
जोडव्यांच्या वरी तुझे खिळलेले डोळे

# १०

तुझ्या पानात जेवलो तुझ्या बरोबर
तेच अखेरचे,
तुझ्या नथीचे चांदणे डाव्या हाताने सावरीत
मीपण घातलेला चिमुकला घास
तुला आठवतोय ?
बाहेर मांडवात सनईचे सूर भरून वाहणारे
तुझ्या मनासारखे,
आणि मधूनच ताशाचे तडतडणे
अवखळ मुलासारखे,
शेवटचा दहीभात कालवताना
तुझे डोळे भरून आलेले
जाणवतात आता पदोपदी
अन्नासाठी दाही दिशा भटकताना

## ११

दुपारी
भाजीत मीठ घालायचं साफ विसरलीस,
संध्याकाळी
श्यामची आई भेटली असती देवळात
तर
कुंकू लावण्याआधी खळखळून हसली असतीस
की
गळ्यात गळा घालून रडली असतीस ?

# १२

काखेत घागर, डोईवर घागर
काठातुन घागर ओघळते
पाखरांच्या सादात, जोडव्यांच्या नादात
डोईवर पाणी डुचमळते

बाबांच्या फाटक्या उपरण्याची चुंबळ
आई, तुझ्या डोईवर कशी ठरते
चुंबळीवर कुऱ्यात, घागर बसे तोऱ्यात
आई, तुझी उंची मग खूप वाढते

किती पाणी आणशील. घाम तरी टिपशील
ओले कुंकू बघ तुझे ओघळते
घामेजले कपाळ . . . दिसे रक्तबंबाळ
आई, मला मनातुन भीति वाटते

## १३

अर्धवट विझलेल्या निखाऱ्यांनी पेंगणारी चूल,
छपराकडे वळणाऱ्या निळसर धुरातून
अडखळत उतरणारे दुपारचे कलते कवडसे,
जेवलेल्या ताटात तशशी उमटलेली
बाबांची दहीभाताची बोटे,
समईवर उमललेली सोनचाफी पुनव,
जेवणाआधी डोळे मिटून बसलेली तू
एकशेआठ खडे घेऊन,
त्यातले चारपाच चिमुकल्या हातांनी काढून घेतलेले
गंमत म्हणून नव्हे

# १४

नदीचे कोरडे पात्र
फक्त तू, मी आणि कातरवेळ,
घागरीच्या सोबतीला सांजवाऱ्याची मंद झुळूक
पाणाऱ्याला पाझराची चाहूल लागावी तशी,
तेलतव्याएवढ्या ऊबदार जागेत
वाळूखालची वाळू उपसलीस वीतभर, तेव्हा
चहू बाजूनी धावले
पाणी नितळ सावळे
काकणांना बिलगून
पाणी आनंदात न्हाले !
मग हळूहळू झऱ्यात उगवला चंद्र
अष्टमीचे आकाश घेऊन,
आई चांदोबा झऱ्यात कसा ?
म्हणालीस घागर झोका देऊन उचलत
ज्याला जिथे हवा तस्सा !

दिसला नाही कधीच तसा चंद्र
पुन्हा कोजागिरीलाही

कार्तिकी पहाटेच्या झुंजूमुंजू अंधारात
हसली खुदकन राजकन्या
सगळ्याच फुलवाती एकदम उजळाव्यात तशी,
नंतर आपण सोडले दिवे
काठावरच्या लाटावर . . . लाटावर,
तुझे दिवे, माझे दिवे
राजकन्येचे सोनपंखी दिवे

लाटांच्या हलत्या ज्योतीवर
खिळवून नजर
एकदम म्हणाली:
पाठवून द्या ना याला खेळायला . . .
आणि झर्कन वळली पाठमोरी
आपल्याच नादात, सोनकोवळ्या उन्हात,
तिच्या सारवटगाडीचा आवाज
घुंगुरलाटेबरोबर दूर दूर जाणारा

नाही धाडलंस खेळायलाही
सारे सारे आता कळते
पण राजकन्येच्या डोळां पाणी
कशासाठी आले होते ?

माझ्याहून तू अधिक आवडतेस मला
तुझे प्रेम तर्काच्याही पलीकडचे
अज्ञात ताऱ्यावरून झरत राहणाऱ्या प्रकाशवर्षासारखे,
तुझे प्रेम न्हाणे, धुणे, दूध पाजणे
यांच्याही पलीकडचे

सैपाक करताना मधेच वळून
खेळकर बाळाकडे बघतेस थोडे हसून
तेव्हा तुझ्या मनात उमललेली फुले
माझ्या गालाच्या खळीत दाटलेल्या तुझ्या
दूधपाण्यासारखी,
या फुलांमधून वळणारी हळवी पाऊलवाट
तुझ्या गावाकडे नेणारी

## १७

फुलाला विचारले
कळीला प्रथम कधी पाहिलेस:
गंध उधळीत फूल हसले

लाटेला विचारले
नदीला प्रथम कधी पाहिलेस:
लाट खुशीत झुलत राहिली

चांदण्याला विचारले
चांदोबाला प्रथम कधी पाहिलेस:
चांदणे हळूच पाण्यावर झुकले
चंद्राच्या मायेने अधिकच फुलले

गाभुळल्या पायवाटेला विचारले
मातीला प्रथम कधी पाहिलेस:
मान मुरडून पहात
ती सरळ धावत सुटली डोहाच्या काठाने
आपल्याच नादात

आठवणीला हळूच खुणावले
आईला प्रथम कधी पाहिलेस:

ती इकडे तिकडे खूप फिरली
अंगणातल्या प्राजक्ताभोवती भिरभिरली
ताकाच्या मेढीजवळ रांगत गेली
बाळंतिणीच्या खोलीत डोकावली
आईच्या जोडव्यांच्या आवाजाभोवती घुटमळली,
शेवटी काजळभरले डोळे चोळत
थकून आईच्या पदराआड लपली
तिच्या नजरेतल्या शतजन्माच्या चांदण्यात नहात

# १८

गोपाळकाल्यातल्या दहीहंडीचे खापर पायतळी घेऊन
उभी आहे सैपाघरातली ताकाची मेढी
सनातन प्रश्नचिन्हासारखी,
आणि ताक करताना भिंतीवर नाचणारी तुझी
पहाटसावली
अजूनही तशीच चित्रित झालेली
समोरच्या तसबिरीत उमटलेल्या पिवळसर
निरांजनासारखी,

तालावर किणकिणणारी तुझी काकणे
जसे कृष्णयशोदेचे प्रश्नोत्तरी गाणे,
आणि मधूनच तुझे हसणे
कोणत्या प्रश्नाचे उत्तर देव जाणे,
तसे . . . सारेच दुवे आता निखळलेले,
तरीपण मनात रेंगाळतोय अजून
हरवलेल्या गाण्यातला संदर्भरहित प्रश्न
आणि
तुझ्या अनोळखी स्मिताआडचा गोपाळकृष्ण

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
ग्रं. क्र. २५४४
२५८६०
काव्य
शाखा (स्थळ प्रत)

शब्दांच्या मायावी सभेत मांडलेला पट,
द्यूतात न खेळता देखील हरलेले वडील,
नंतर जुनाट वाडा पेटावा तशी पेटलेली भाऊबंदकी
नक्षीदार तुळया. विश्वासू कडीपाट, ब्रह्माचा खांब
कडकड कोसळणारे कंदिलाच्या लहानमोठ्या प्रकाशात,
एकदम पाठीमागचा तक्क्या काढून घ्यावा तशी
अपमानाची भाषा,
थरथरते इवले पंख सावरीत झोपाळ्याच्या कडीला
बसलेला मी
आणि माजघराच्या चौकंड्यातून संथ नजरेने
डोकावणारी तू,
वीज लवावी तशा हातातल्या गोटपाटल्या बैठकीत
भिरकावीत कडाडलीस :
आता . . . अक्षर नका बोलू भाऊजी . . .

घडीभर चौकटीवरची काचेची तोरणं किणकिणली
आणि अंधारल्यागत सोप्यातली मंडळी भोवळली

तेव्हा

झोपाळ्यावरच्या पाखराला फुटले अवचित गरुडाचे

पंख

वादळविजात झेपावण्यासाठी

चाळवलेल्या साखरझोपेत
कानावर पडलेले पुसटसे काही . . .
अजूनही अस्वस्थ करणाऱ्या तुझ्या वेदनेचे
काही संदर्भ सुन्न करणारे :

घरदार सोडून
माती उधळीत गेली द्रौपदी वनवासाला
उजळ माथ्याने
पण . . . तुमच्या घरात सोसते वनवास
मुकेपणाने !

नंतर दिशा उजळल्या नेहमी प्रमाणे
तुझ्या आनंदसाम्राज्याचा आरंभ भूपाळीने

# २१

ती कथा तुझी आठवता
दूरातुन पदरव उठतो
सांजेला कुणि बैरागी
दारात अचानक येतो

संध्येचा मेघ विरागी
उत्तरीय त्याचे होते
राखेचे नक्षत्रांच्या
भाळावर भस्महि होते

नजरेत उतरली त्याच्या
शत प्रकाशवर्षे मंद्र
स्नेहाने कारुण्याच्या
डोळ्यांत उजळले चंद्र

काष्ठाने हातामधल्या
कोणती तुडविली राने
वाऱ्यावर कल्पतरूची
वाळली उडावी पाने

स्नेहाळ तयाची बोटे
वज्राची करती पूड
आईच्या प्रेतालाही
लाविली जयांनी चूड

मंत्राच्या ओठामधले
मौनातच शब्द बुडाले
कुठल्याशा राउळरानी
घंटांचे स्वर घणघणले

डोळ्यांत गायिच्या चुकल्या
दाटून कडोसे यावे
बैरागी शब्दांमधले
की कमंडलू सांडावे

भिक्षेचा कण नच घेता
संन्यासी परतुन जातो
पायिच्या खडावासाठी
हृदयाचा ठोका चुकतो

ती कथा . . . संपण्याआधी
काजळी दिव्यावर चढली
दुखणाइत नजरेवरती
काळाची फुंकर पडली

ती कथा तुझी आठवता
दूरातुनि पदरव उठतो
सांजेला कुणी बैरागी
दारात अचानक येतो

# २२

गंमत म्हणून, आईची चाळशी चढवून
सकाळच्या उन्हात गेलो थोडा परसात :
तेवढ्यात केळ दिसली पोसवलेली
तिला छान अळे केले
दहीदुधासाठी भातात करतात तसे,
चिवचिवणाऱ्या चिमणीसाठी मडके भरून ठेवले,
पाडाचा एक पेरू शबरीच्या हाताने टिपला,
पानात हरवलेला हिरवा चाफा अलगद खुडला,
उकिरड्यावरचे तुळशीचे रोपटे
भामाबाईला दिले : उकिरड्याचा पांग फिटला,
पायातला टोकेरी दगड बाजूला फेकला,
इतक्यात
चुलीवरचे वर येणारे दूध कानात गुणगुणले
तसा लगबगीने आत गेलो !
आईची चाळशी काढून ठेवली
मग हलके वाटले

# २३

तुझ्या लग्नात
जावेने घेतलेला उखाणा
अजून आठवतोय तुलाः
कदाचित सहज असेल

सनईचा पहाटपूर
वेगळाच वाटतो तुला :
कदाचित रसूलभाई आज आला नसेल

कबरी गाय येऊन गेली नुकतीच
बरोबर जाणवते तुला :
कदाचित सड्यावर तिचा पाय उमटला असेल

पण कसा ओळखातेस
कालचा पक्षी
अंगणातल्या थव्यामधला:
सकाळी अंगण होतेस काय ?

# २४

र ब क वी नव्हे
इरकली लुगड्यासारखे गडद निळे आकाश,
जरीकाठी रुमालासारखा
पांढराधोट चंद्र,
कौलावर रेंगाळणारा चुलीतला धूर,
अंगणात गप्पाना सनईपूर,
आणि भाकरी करता करता
मधेच चौकंड्यातून डोकावून घडीभर
स्मिताचे मायाळू चांदणे फुलवून जाणारी तू,

सर्व सुखाचे आगर
बाप, रखुमा देई वर

सहज तू एखादे बी अंगणात टाकले
खडकावरही त्याचे रोपटे उगवून आले,
इवले रोपटे तहानेने व्याकुळलेले
तुझे पाणी त्याच्या ओठी दूध झाले,
डोळ्यांनी तू त्याच्यासाठी म्हटले गाणे
ब्रह्मानंदी हरवून गेली त्याची पाने,
तुझ्या श्वासानेही त्याचे पान हलले
त्याला वाटे फुलपाखरू मिरवून गेले,
उन्हात त्याच्यावरती तुझी सावली पडली
त्याला वाटे मेघाची ही चाहूल कुठली,
वाढते रोप बघून तुला हसू आले
त्याच्या भोवती सप्तरंगी वैभव झुलले,
माझ्या सारखे त्यालाही तू काय दिले
पानाआडची उमलून आली सारी फुले,
आठवते ग खुडली नाहीस कधीच फुले
पदरात घेतलीस झाडाखालची सारीच मुले

## २६

माझ्या बोटांवर तिच्या चाफेगौर बोटांचे शहारे
जसे झाडातून उतरणाऱ्या किरणावर भिरभिरणारी
फुलपाखरे,
घडीभर गुंतून गेली बोटे बोटात
जणु वेणीचे पेड एकमेकात,
नंतर पंख सावरीत नवलपाखरू उतरावे तसा
तिचा गुलाबी तळवा अलगद माझ्या हातात,
माझ्या आयुष्यरेषेवर विसावली
तिच्या तळहातावरची नितळ आयुष्यरेषा
जेव्हा तिच्या रक्तातल्या चमकत्या विजानी
भोवंडून गेले माझे नजरेआडचे हरवलेले घर,
धनरेषेवर झुकली तिची जरतारी धनरेषा
आणि माझ्या भाग्यरेषेवर उमटला अचानक धनलाभाचा
आरक्त योग,
तिच्या हातातील चंद्र प्रकाशला घडीभर
माझ्या हातातील चंद्राच्या उंचवट्याआड,
तिचे प्राक्तन असे डोकावले माझ्या भविष्यात निमिषार्ध
नियतीच्या विभ्रमाचे गेंद उमलून मिटावेत तसे,
सारेच घडले लवत्या पापणीच्या स्वप्नक्षणात

पण तेव्हा देखील भिरभिरत होती तिची नजर
सांजमेघाआडच्या चांदण्या शोधत !

निरोप देतेवेळी, हातावर
वाट चुकलेल्या गायीचे दही तर नाही घातलेस,
आई ?

# २७

सांगायलाही लाज वाटावी
अशा अनेक प्रसंगातून वाचविलेस आपणहून:

कसे ओळखलेस
फुलांच्या जाळ्यात फसलो होतो म्हणून,
जाळे आणि पंख
यांच्याही पलीकडे जाणारी तुझी नजर

चुलीवर पातेली चढवीत म्हणालीस
हे बघ . . . दूध आहे हातात ! कळलय मला सारं

आठवतोय तुझा चेहरा
काळजाचे पाणी पाणी करणारा
अग्निरसात चिणलेल्या थंड ज्वाळेसारखा,
दुसऱ्याच क्षणी
वेगळच काहीतरी बोललीस हसत . . . हसत
मधल्या वेळात कुठं कुठं जाऊन आलीस देव जाणे
तेव्हापासून कॉलर सांभाळीत आलोय

उसनवारीचे तांदूळ वैरताना गळणारे तुझे डोळे
आणि
भाकर थापता थापता
चुलीत धुमसणारे अपमानाचे वासे
यांच्याही पलिकडे होतीस तू !
त्या तुला एकाएकी आठवून
विझवून टाकायचा मी जळणारा पिवळा हत्ती
कॉलेजच्या कठड्यावर
पुटपुटत विद्यार्थ्यांच्या अपराधी ओठांनी :
पहिला टाहो फोडण्याआधीच
नख का नाही लावलस ?

# २९

कपाळावर कुंकू तुझ्या सारखेच
थोडं लहान, थोडे मोठे
नऊवारी नेसणे अगदी तसेच
थोडे खरे, थोडे खोटे

ओठांतले स्मिताचे फूल
तुझ्याच बागेतले
वेदनेचे पाणी पिऊन
उमलून आलेले

पिळाच्या बांगडीला वळसे तसलेच
रेशमी काचेचे
कदाचित त्याला चिकटले असेल
पीठ भाकरीचे

सारे तुझेच घेऊन, तिने
रस्ता ओलांडला
आई, ती तूच म्हणून
मी नमस्कार केला

काजळाच्या वडीसारखी जमीन एक एकर,
तुझ्या हातांतले उरलेले केसासारखे दोन
बिलवर,
खोप्यात घालायचे टपोरे सुवर्णफूल,
तीन महिने तू नेसलेले एकच एक जुनेर,
आणि देवळावरचे चुकलेले ( ! ) संक्रांतीचे
हळदीकुंकू,
एवढा मोबदला देऊन मिळविली
केवळ सर्टिफिकेटाची एक वांझोटी भेंडोळी,
उळगडण्याआधी देवापुढे ठेवून म्हणालीस
अरे, धीर धरावा

# ३१

किनाऱ्याला आठवते भरतीची लाट :
लाटेतले आकाश त्याला भेटून गेलेले असते
मधुचंद्राच्या रात्री तू ओवाळताना आम्हांस
असेच काहीसे जाणवले होते

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
काव्य २५८४
२५०६७
३।७।७६
(स्थळ प्रत)

परसातली हाक
ऐकू जाणार नाही अंगणातल्या माळणीला
एवढा मोठ्ठा तुझा वाडा,
इथे गुदमरलीस चार दिवसात
एका खोलीतल्या आमच्या नव्या नवतीच्या संसारात,
पण अजून ताजी आहे मनात
मोगरीची कळीदार वेणी
हिच्या भरगच्च अंबाड्यावर माळलेली तू
त्या संध्याकाळी,
रात्री जेवणानंतर अवचित गेलीस शेजारणीसंगे
कुठल्याशा कीर्तनाला की प्रवचनाला
हिच्याकडे बघत . . . हसत,
( कळ्या उमलाव्यात म्हणून ? )
रात्री कितीला परत आलीस ते कळाले सकाळी
नजर चुकवून चहा पिता पिता

# ३३

आई, खरच का ग मुलाचे पाय पाळण्यात दिसतात ?
मग, सांग बरं :
हातात थुंकी झेलीत जगणाऱ्या
आपल्या या मुलासाठी
कशाला विणलेस हातमोजे ?
आणि कशाला भरलेस काजळ
त्याच्या लाचार डोळ्यांत ?
मेलेल्या अन्नावर जगणाऱ्या आपल्या मुलाला
कशाला धरलेस छातीशी ?
दुसऱ्याच्या घरी स्तुतिपाठाचे रतीब घालण्यासाठी का
तू त्याला बोलायला शिकविलेस ?
आणि
आयुष्यात न सापडलेल्या ओळी विसरण्यासाठी का
त्यानं तुझी धुळाक्षरं गिरविली ?

आई, आता कळते :
प्रथम वाटा निर्माण झाल्या
आणि मग निर्माण झाले पाय !

फक्त तू
शब्दांतली मरणं जगविलीस . . . म्हणून . . .

## ३४

समोरच्या गरुडखांबाजवळ
कीर्तनमग्न सुवासिनीचे डोळे लकाकले आनंदाने.
तिच्या वृद्ध पापणी आडून
तू तर नाही डोकावलीस ?

एक मिटलेले घर
एका माणसाच्या गेले स्वप्नात
तेव्हा सारे शहर झोपी गेलेले ट्यूबलाइटच्या
प्रकाशात

स्वप्नात बोलले कौलारु घर
वाळलेल्या अंब्याच्या तोरणासारखा त्याचा स्वरः
अरे, तुम्ही येणार तरी कधी,
केर नाही, वारा नाही,
जिकडे तिकडे घरोशाची हंड्याझुंबरे
देव्हाऱ्यावर कोळियांची हलती घरे
आमची सारीच दैना आहे
आमची सारीच दैना आहे
तुम्ही येथे नसल्यावरती
आम्हालाही भीती वाटते . . . भीती वाटते

खेड्यामधले कौलारू घर
सर्वांगाला चिंब करते
आपली चाहूल मनावरती गोंदून जाते
न्हाऊ घालण्याआधी
भुईवर उमटलेल्या आईच्या तेलबोटासारखी

# ३६

नवरात्राआधी घर सारवताना
फुटक्या आरशाचा तुकडा भिंतीत चिणून बसवावा
तसा तुझा शब्द
आठवतोय अजून:
हे बघ,
कोचलेल्या आवळ्यासारखं
दु:ख तळहातावर घ्यावं
आणि त्याच्याकडं बघून मनमुराद हसावं
म्हणजे ते हलक वाटतं !

आई, आजकाल करतोय तसच
पण हसता हसता
मधेच डोळ्यांत पाणी आले तर त्याचे काय करायचे
एवढेच विचारायचे राहून गेले

सहजच आठवले:
मोजून शंभर पणत्या उजळल्या त्या संध्याकाळी
आणि
तुला हाक मारली,
लगबगीने अंगणात येत म्हणालीस:
छान !
आणि पायरीवरचा एक दिवा तुळशीपुढे ठेवून
सैपाघरात निघून गेलीस,
तेव्हा
तुझ्या पाऊलखुणांवर उमटत गेली

एक दीपावलि

# ३८

किडबिड ऽ किडबिड ऽ किडबिड ऽऽ

अंगणातली रांगोळी विसकटणार आहे,
गणेशदरवाजाची भिंत कमरेत खचणार आहे,
चौकटीवरचे अंब्याचे तोरण तुटणार आहे,
ब्रह्माचा खांब कोसणाळर आहे,
माजघरातल्या कण्हणाऱ्या अंधारावर
कुंकवाचा मळवट चढणार आहे,
किडबिड . . . किडबिड . . . किडबिड . . .
सडा घालता घालता
पाठमोऱ्या पिंगळ्याकडे पहात

पुटपुटली आई:

जळ्ळं मेल्याचं लक्षण !

वाऱ्यावर हेलकावणारी रुईची माळ माझ्या हातात
झपझप पडणारी पावले आणि धावणारा मी
तुझ्या जोडव्यांच्या नादात,
संगीताहून मधुर असे तुझ्या ओव्यांचे नवे स्वर
पानाआडच्या पाखरांचे गाणे म्हणजे तुझ्या गीतांचे भाषांतर,
दुसऱ्यांदा म्हणता येणार नाहीत अशा तुझ्या ओळी
खळाळत्या ओढ्यावर जुळते एक दंतकथाच वेगळी,
तुझे एकेक कडवे म्हणजे पाठमोऱ्या संताच्या पाऊलखुणा
तुझे संपलेले गाणे, जसा प्रार्थनेनंतर स्थिरावणारा संथपणा !
भावळतीच्या उनात तुझे लगबगीने चालत रहाणे
आणि मागे वळून बघत माझ्यासाठी थोडे हसणे,
सांज उतरुन येण्याआधी वळणावरून पुढे गेलो
पिवळ्या पिवळ्या अंधारात हळूच गाभाऱ्यात शिरलो,
फडफडणाऱ्या पाकोळीला घाबरून लपलो पदराआड
खळखळून हसलीस तू, पाणी माझ्या पापणीआड

अजून तशीच वळणवाट, अजून तशीच हिरवी माळ
अंथरुणाला खिळलेली तू, डोळ्यात माझ्या. संध्याकाळ

# ४०

तुझा एक्सरे
अवेळीच अंधारुन यावे तसा,
ही अन्ननलिका,
इथे ही ग्रोथ,
चंद्रकोरीसारखे मंगळसूत्र तस्से उमटलेले हट्टाने
क्ष किरणांचा पराभव करीत,
आणि मुहूर्तमण्याजवळ
तुझी जिवतीतली हसतमुख सवत
जिला नित्यनेमाने हळदकुंकू लावतेस,
सदरहू बाबत एकच प्रश्न:
प्रथम तू तिला
की
तिने तुला ?

ओल्या पावलांनी घरात येत म्हणालीस:
अरे, शेजारी सारं सामसूम,
ओंजळभर रडं नाही,
कुडचाभर पाणी नाही ,
एक सून या कोपऱ्यात,
एक सून त्या कोपऱ्यात,
मुलं आपली अशी तशी . . . दूरदूरच,
लेकीनं पाठ फिरवलेली पदराखाली घेंत,
बिच्चारं ऽ पडलेलं रे तोंड वासून
गाडीच्या सडकेवर बेवारशासारखं,
रडण्याखेरीज शोभा नसते मढ्याला !
इतका केसागणिक गोतावळा
प्रेताचं तोंड दिसलं नसतं,
मरावं कसं हे देखील कळाव लागत !

# ४२

सैपाक करताना
तुझ्या डोळ्यांत दाटून येणारे अश्रू,
आणि फोडणीची मोहरी उडावी तसा
घशात तडकलेला शब्दहीन हुंदका,
दर्भावरून ओघळत जाणारे मंत्रोच्चार
अज्ञाताच्या कावळ्याचा वेध घेणाऱ्या काकुळत्या नजरेसारखे,
वडिलांचे केविलवाणे सव्यापसव्य,
दुपार कलली तरी तशाच विखुरलेल्या
दर्भाच्या काड्या आणि ओल्या अक्षतांचे दाणे,
वाढून ठेवलेले एक केळीचे पानही तसेच पडलेले
निघून गेलेल्या माणसाच्या आठवणीसारखे,
दिवसभर सैपाघरात असूनही नसल्यासारखी तू
सांगायचीस उदास आवाजात:
आत्ताच गेल्यागत वाटतात रे मामांजी
असं . . . भिंतीकड तोंड फिरवून गेले
कळलंसुद्धा नाही . . . कळलं सुद्धा नाही !

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र.

# ४३

काहीस आठवून
सत्तरीतल्या आईला विचारलं ;
तुझं वय किती

फुलवात वळता वळता
ती मिस्किल हसली :
माझं चाळीस आणि यांचं पन्नास,
आता सांग !

न सांगण्यासारख एवढंच :
तुमच्या वाचून मी वृद्ध होईन

सांजावल्या उन्हाला नचिकेतस्पर्श झाला
वाऱ्यावरी कुठोनि बुक्का वहात आला

अब्दागिरी नभाची झाडांत टाळधून
वेशीवरी उभा मी काळीज अंथरुन

चोचीत पाखरांच्या ही कोणती विराणी
पंखावरून वळला कैवल्यमेघ कोणी

नव्हते कुणीच येथे, गेले निघून कोण
वाटेवरी तमाच्या कसली प्रकाशखूण

वळणावरून गेले योगीच का वळून !
कफनी वरील त्यांच्या सांडे उदास ऊन

वेशीवरी न येता दिंडी दुरून जाई
रस्त्यातल्या धुळीतच बसली हताश आई

# ४५

परसातली तुळस
सुकून जाणार नाही,
देवापुढचा दिवा
विसरून जाणार नाही,
श्रावणातली कथा
अर्धी सांगणार नाही,
दारातला भिकारी
परतून जाणार नाही,
फाटलेला शर्ट
कुणा दिसणार नाही,
दोघींना भाऊबीज
पाठविणार नाही,
माजघरातली पेटी
उघडणार नाही
नथ घातलेला फोटो
बघत बसणार नाही,
अंधारातला अश्रू
खाली सांडणार नाही,
वेदनेचा किनारा
शब्द असणार नाही !

अरे, आपण गाव सोडले तरी
गावाचे नाव पुसत नाही,
आणि घर विकले तरी
घराची आठवण विकत नाही,
त्या परसात पुरलीय तुझी नाळ
आणि वर लावलंय एक गुलाबाचं झाड
त्याला म्हणे रक्तासारखी लाल फुले येतात

परवा अचानक
ते गाव गवसले प्राणांच्या धुक्यात हरवलेले,
आणि घरही सापडले
विसकटलेल्या श्वासात चुकलेले,
फरक एवढाच
तेथे झाड उभे बाभळीचे
आकाशात नजर खुपसून नक्षत्रांना खुणावणारे

# ४७

आपल्याच राखेतून उठून
घरी परत आलीस, तर
आधी एवढं कर:
गायीच्या पाठीवरुन एकदा हात फिरव
म्हणजे ती अशी हंबरणार नाही
आणि
तुझ्या हातचा गरम वरणभात मला वाढ
म्हणजे मी असा झोपेतून बरळत उठणार नाही !
पण
तुझ्या ऊनकोवळ्या मायाळूपणाला झाकोळणारी
हि सावली आता कशाची ?

पान गळून पडतेवेळी
झाडाखालची हवा थरारते विस्कटलेल्या श्वासासारखी
आणि जमिनीत खोल जाणारी मुळे
क्षणभर थबकतात अगतिक होऊन
तेव्हा पाताळातला काळोख अधिकच गडद होतो
दाटून आलेल्या अवसेसारखा

पान गळून पडते झाडाखाली, तेव्हा
पानगळीची आठवण शिल्लक राहते फांदीवर
निघून गेलेल्या माणसाच्या कोटटोपीसारखी

पानगळीच्या वेळी
एखादे पान जाऊन पडते दूरावर
अनोळखी प्रदेशात कोसळणाऱ्या विमानासारखे
तेव्हा झाड अधिकच उदास होते
जन्मभूमीशी नाते तुटलेल्या कवीसमान

पान गळून पडतेवेळी
पाना एवढे आकाश शिल्लक रहाते
प्रत्येक पानाच्या ठिकाणी

पाने गळून पडली तरी
निष्पर्ण फांदीवर येऊन बसतो एक फुलाएवढा पक्षी
आणि बोलत राहतो आपणच आपल्याशी :
मावशी गेली, मामी गेली, दादा गेले, आण्णा गेले !

झाड एकाकी उभे आभाळात नजर खुपसून
वेध घेत
क्षितिजा पलिकडच्या वसंतऋतूचा

कंदिलाची काच पुसून ठेवली आहे
आणि
दिवेलागणीची वेळ टळू लागली आहे,
पण आज दिवा का बरे लागणार नाही,
कोणत्या अज्ञात ग्रहावरचा प्रखर काळोख
आज दाटून आला आहे माझ्या दारात ?
घशातला हुंदका देखील आज अडला आहे
औषधाच्या रिकाम्या बाटलीत रेंगाळणाऱ्या कडवट वासा
सारखा
परतणाऱ्या सगेसोयऱ्याप्रमाणे दिसू लागलेत
एक एक तारे
म्हणजे बहुतेक सगळ्याची राख झालीच म्हणायची,

दिवेलागणीची वेळ तर अशी टळू लागली आहे !

तुझ्याशी खूप बोलायचय . . .
पण तू तर आता निघून गेलीस
हाकेच्या पलीकडे . . . न परतीच्या वाटेने
माझ्यासाठी ठेवून शेषप्रश्न,
लहान मुलाला रडून रडून ग्लानी यावी
आणि
त्याच्या पुढच्या अस्ताव्यस्त खेळण्यांना अचानक जाग यावी
तशा तुझ्या आठवणी.
समोरच तुझा हसरा चेहरा . . . फोटोतला
पण त्या गोठलेल्या रेषांना बोलता कुठं येतय ?
तरीपण विचारतोय :
शुद्ध हरवण्याआधी म्हणे
पुटपुटलीस ओठातल्या ओठांत काहीतरी
कंदिलाच्या लालकाळ्या प्रकाशात . . .
आता
तुझे मरणप्रहरीचे न जन्मलेले शब्द आकाशभर
आणि दिवसरात्र हरवून बसलेले माझे क्षितिज पापणीभर !

पहिल्या पावसाने भिंतीवर ओघळ आला की
तू हसून म्हणायचीस
अरे, ती बघ आली सवाष्ण !
आणि नंतर
न शाकारलेल्या आढ्याकडे नजर टाकायचीस

आजकाल घरं झालीत सिमेंटच्या काळजाची.
आता
तुझ्या त्या वळीवपावलाच्या सवाष्णी
अंग चोरुन उभ्या असतात तुझ्यासहित
माझ्या बंद पापणीच्या वळचणीला
कळत नकळत

## ५२

पंढरीला गेल्यावर
नदीत तू जिथे अंग धुशील
त्याच्या थोडसं खालच्या बाजूला
मी बुडी मारेन,
आणि तुझ्या जळलाटा
मला कुरवाळायला येतील
तिथून खाली माझी चंद्रभागा वाहू लागेल
पण तुझ्यासंगे पंढरीची वारी घडलीच नाही
म्हणून
आता मला कोणतेही पाणी
केवळ एच् टू ओ

## ५३

तुझ्या कथेतील
भरून आलेली श्रावणातली संध्याकाळ
लहान मुलाच्या डबडबलेल्या डोळ्यासारखी,
अनवाणी पावलांनी
किर्रऽ अरण्य तुडवीत जाणारा राजकुमार,
सरोवराकाठचा कळस बघून त्याचा उजळलेला चेहरा
सोन्याच्या डोंगरावर लखलखणाऱ्या कवडशासारखा,
इकडे अंगणात कितिदातरी सर येऊन गेलेली
आणि
कितीदातरी इंद्रधनुष्ये झुकून विरलेली . . .

गिलावा उडालेल्या भिंतीवरचे पिवळे घड्याळ
अजूनही चालले आहे अविरत
म्हाताऱ्यासारखे काठी टेकत टेकत !

उडण्याआधी
आपली फांदी देणाऱ्या पक्षिणीची गोष्ट
सांगून म्हणाली होतीस :
अरे,
शेवटी निरांजनाला आधार असतो गाभाऱ्याचा
केवळ ताम्हणाचा नव्हे !

रुपेरी पडद्यावर फक्त हलत रहावेत ओठ
आवाज ऐकू न येता
तसेच लिहीत गेलो का ग शब्दामागून शब्द,
पर्जन्यछायेच्या प्रदेशातून सरकत जाणारे आशयघन
आणि रानभरी पहुडलेले माझे तृषार्त मन . . . पंख पसरून,
तू तर अजून सापडली नाहीस !
तशी जाणवली एखाद्या शब्दाच्या नजरेत तुझी पाठमोरी
चाहूल
उदयाआधीच्या प्रकाशासारखी,
एरवी ओळीओळीत उमटलेली तुझी रूपे
फुटक्या आरसेमहालातील दूरस्थ धूसर प्रतिबिंबासारखी,
अमूर्त अक्षरांचे धुंडाळले अनेक घाट
पण फसत गेलो अर्थाच्या अबोध वळणावर,
आता सगळीकडेच तू . . . पण कुठेच नाहीस !
म्हणून
चालू राहील सदैव माझी शब्दयात्रा पाऱ्याच्याही पलिकडे
अखेरच्या श्वासापर्यन्त

# ५६

सांजउन्हाचे सोने वितळताना नदीच्या पाण्यात
म्हणाली होतीस ; तो बघ रामाचा मुकूट !

अरे, शरयू तीरावर उमटली रामाची पाउले
वाळवंटाची झाली पांढरी पांढरी फुले,
राम हळूच डोहात शिरले
नदीचे डोळे ओले, ओले,
राम थोडे पुढे गेले
पाणी घोट्याजवळ गेले,
राम आणखी पुढे गेले
पाणी गुडघ्याजवळ गेले
तळहाताच्या रेषांना स्पर्शून
पाणी सैरावैरा झाले,
राम खूप पुढे गेले
पाणी हृदयाजवळ गेले
सीतेला स्पर्शून पाणी वनवासी झाले,
राम आणखी पुढे गेले
पाणी ओठाजवळ गेले
लाटांनाही विसरून
पाणी मुके मुके झाले

राम आणखी पुढे गेले
पाणी पापणीजवळ गेले
पाण्यावर तरंग् लागले
त्यांचे कमळासारखे डोळे,
राम खोल खोल गेले
आई ऽ . . . थांब !
अरे, मग राम दिसेनासा झाला
त्याचा सोनेरी मुकूट असा तरंगत राहिला !

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र.

**वि. वा. शिरवाडकर/राम शेवाळकर/शिरीष पै**

आपल्या सतरा कविता मिळाल्या सर्वच कविता हृद्य वाटल्या. या आईच्या कवितांतील अकृत्रिमता, थोड्या शब्दांत चित्र रेखाटण्याची क्षमता, वातावरण, हळुवारपणा – सर्वच चांगले आहे. कोठेतरी चांगल्या ठिकाणी प्रकाशित करा . . ."

नासिक / १३ फेब्रुवारी १९८१ : **वि. वा. शिरवाडकर**

"श्रीरंग विष्णु जोशी यांनी ऐन तारुण्यात आईच्या कविता आळवाव्यात हे एक सुखद नवल आहे. प्रेयसी–पत्नी ही तारुण्याची भुलावण त्यांच्याही कवितेत येते. पण ती प्रामुख्याने आईच्या आश्रयाने येते. त्यांची या कवितांमधील आई सर्वव्यापी आहे. इरकली नऊवारी लुगडे, हातातले बिल्वर, खोप्याची वेणी, वेणीतले फूल, केतकीच्या कणसावर पानावर पान चढावे तसे रूप, या खुणा कुठेही दिसल्या तरी त्यांना आईचा भास होतो व ते त्या अनोळखी अनामिकेला आई म्हणून नमस्कार करतात. त्यांना भावलेली आईची अनेक रूपे या कवितांमध्ये आपल्याला आढळतात. ती अतिशय हृद्य व विलोभनीय आहेत. आईच्या स्वभावाचा हालचालीचा व वागणुकीचा त्यांनी टिपलेला तपशील न्याहाळतांना मन लोभावून जाते नि काहीवेळा काळजाला चिमटा बसतो. ओझरत्या घरगुती उल्लेखातही जिव्हाळा ओतप्रोत

भरलेला आहे. त्याच्या स्पर्शाने नकळत मन गलबलून जाऊन टचकन् डोळ्यात पाणी येते.

आई कुठे नसते? अंगणापासून परसदारापर्यन्त, ओसरीपासून स्वयंपाकघरापर्यन्त, सर्वत्र तिचे मायाळू अस्तित्व भरून राहिलेले असते. आई सणावारात असते, कुळाचारात असते, कुटुंबाच्या रीतीभातीत असते, सकाळच्या भूपाळीत असते, रात्रीच्या अंगाईमध्ये असते, उष्टावणात असते, मातृभोजनात असते, देवघरात असते, गणेश दरवाजा, ब्रह्म्याचा खांब, माजघराचा चौकंडा या सर्व ठिकाणी तिचे दक्ष मातृत्व वावरत असते. लेकराच्या आचेनी ती घरादाराचे, कुटुंबाच्या स्वास्थ्याचे घराण्याच्या प्रतिष्ठेचे डोळ्यात तेल घालून रक्षण करते. तिचे डोळे उघडे असतात, ओठ मिटलेले असतात, चित्त सावध असते. कित्येकदा गृहशांतीला ओरबाडून काढणाऱ्या क्षणानी ती आतल्या आत गदगदत असते. निःशब्दपणे वादळांचे घोट गिळत असते. तिचे पाणावलेले डोळे निगुदमरून टाकणारे हुंदके एका अप्रिय वास्तवाला पदराखाली झाकून घेतात. पण ओठातून बाहेर पडणारे शब्द साममंत्राचेच आश्वासन देतात.

श्री. जोशी यांना आईच्या ओव्या गाण्याचे स्फुरण व्हावे, त्यांच्या आवाजाला साथ देण्यासाठी त्यानी माझ्यासारख्या एका मातृहीनाला आमंत्रण द्यावे हाही योग एखा-

द्याला नियंत्याच्या कल्पकतेचे विलसित वाटेल. मी बाकी विश्वामध्ये भरून राहिलेल्या मातृरूपाच्या वंदनाची संधी म्हणूनच हे आमंत्रण अगत्याने स्वीकारले : या देवी सर्व भूतेषु मातृरूपेण संस्थिता। नमस्तस्यै नमस्तयै नमस्तयै नमो नमः ॥

वणी / वसंतपंचमी, १९०६ / १९८४ **राम शेवाळकर**

" मराठवाडा दिवाळी अंकातून एकत्रित प्रसिद्ध झालेल्या तुमच्या पाच कविता सर्वच चांगल्या आहेत. खूपच आवडल्या.

भारतीय संस्कृतीत आईला आपण खूपच थोर मानतो आणि मातेचे संस्कार सर्वात श्रेष्ठ मानतो. आईचं वात्सल्य, तिची माया, तिचा त्याग, तिनं हसतमुखानं वेदनेचा केलेला स्वीकार ह्या सर्व गुणांची आपण पूजा करतो. ते भारतीय मन तुमच्या कवितेतून अभिव्यक्त झालं आहे. ह्या सर्वच कवितांना कारुण्याची धार आहे. हे आईचं सर्वश्रेष्ठ प्रेम ज्याला लाभलं तो भाग्यवान. तसे तुम्ही भाग्यवान असावेत.

आशय . . , मांडणी , , , या साऱ्याच दृष्टीनं ह्या कविता चांगल्या उतरल्या आहेत,

अलीकडे ' आई ' वर असं तुडुंब, मन भरून येऊन कुणी लिहीताना क्वचितच दिसतं "

मुंबई / १३ जानेवारी, १९८२, **शिरीष पै**

REFBK-0025060
REFBK-0025060